# माझी शाळा निबंध ५०० शब्द

### माझ्या शाळेची ओळख आणि परिसर

माझ्या शाळेचे नाव 'रमाबाई हायस्कूल' आहे. आमची शाळा आमच्या गावातील खूप जुनी शाळा आहे. शाळेच्या भिंत पिवळ्या रंगाची आहे. आमच्या शाळेला छोटे से अंगण सुद्धा आहे जिथे आम्ही रोज सकाळी ७ वाजता प्रार्थना करतो. त्याच अंगणाभोवती फुलांच्या रोपांच कुपन आहे. शाळेच्या मागच्या बाजूला मोठे मैदान आहे. तिथे आम्ही पी टी  तास ला मैदानी खेळ खेळतो. कधी कधी पी टी शिक्षक कांबळे सर आम्हाला मैदानाभोवती शारीरिक व्यायाम म्हणून कसरत पाळायला लावतात. माझ्या शाळेत बालवाडीपासून ते इयत्ता १० व्ही पर्यंत शिकवले जाते. आमच्या शाळेत एकूण २७ शिक्षक आहेत. सर्व शिक्षक शाळेची शिस्त कायम कशी ठेवता येईल याची काळजी करतात. तसेच ते त्यांच्या त्यांच्या विषयात पारंगत आहेत. त्यामुळे गोष्टी समजून घेण्यास फार मदत होते. विद्यार्थी सुद्धा शिक्षकांचा आदर करतात.

### शिक्षक आणि शिक्षणाची गुणवत्ता

सर्व विद्यार्थ्यांवर लक्ष राहावे म्हणून प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांची संख्या मर्यादितच ठेवतात. म्हणून आमचे शिक्षक प्रत्येक विध्यार्थ्याला नावाने ओळखतात. माझ्या शाळेत खास करून विज्ञान आणि गणित सारख्या विषयांवर जास्त भर दिला जातो. कारण हे विषय आम्हा विध्यार्थ्यांसाठी थोडे अवघड असतात म्हणून शिकवताना आम्हाला व्यावहारिक जीवनातील उदाहरणे दिली जातात. माझा आवडता तास हा 'संगणक' आहे. आमच्या शाळेत विज्ञान प्रयोग वर्गाबरोबरच संगणकासाठी वेगळा प्रशस्त वर्ग सुद्धा आहे. संगणकाचे शिक्षक पाटील सर आम्हला संगणकाचे आपल्या जवनातील विविध कामाचे महत्व सांगतात. गुरुजी आम्हाला संगणकीय कौशल्ये शिकवतात. तसेच माझ्या शाळेत एक ग्रंथालय सुद्धा आहे. जिथे आम्ही शाळा सुटल्यानंतर अभ्यास करायला जातो. साधारण ग्रंथालयात इतिहास, भूगोल, सामान्य ज्ञान सारखी १००० पेक्षा जास्त पुस्तके असतील. ज्या मुलांना घरी अभ्यास कारायला आवडत नाही ती मुलं ग्रंथालय मध्ये नियमित अभ्यास करतात. शाळेत विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून किमान ३ ते ४ तास वाचनासाठी वेळ दिला जातो. ज्याने करून मुलांना लहान वयातच वाचनाची सवय लागावी.

### विद्यार्थ्यांची शैक्षणिक सुविधा आणि संगणक प्रशिक्षण

माझ्या शाळेत महिन्यातून एकदा स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यामध्ये चित्रकला, हस्तकला आणि मैदानी खेळ सुद्धा आहेत. तसेच वार्षिक स्पर्धे मध्ये आमच्या शाळेने मैदानी खेळांमध्ये बक्षिसे जिंकली आहेत. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी वकृत्व स्पर्धा सुद्धा असते. 'शिष्यवृत्ती' विद्यार्थ्यांना मिळावी यासाठी मार्गदर्शन दिले जाते. दर वर्षी स्नेह-संमेलन कार्यक्रम सुद्धा आयोजित केले जातात. त्यामध्ये आम्ही विद्यार्थी नाटक आणि देश गीते सादर करतो. नाटकाचा विषय हा नैतिकता आणि समाजसेवा हाच असतो. आमच्या शाळेत सरकारी शिबीर सुद्धा आयोजित करतात. शिबिरामध्ये मोफत चष्मे वाटप, लसीकरण, आरोग्य तपासणी सारखे कार्यक्रम आयोजित करतात. शाळेत आम्हाला स्वच्छेतेचे महत्त्व शिकवले जाते.

### सांस्कृतिक आणि स्पर्धात्मक कार्यक्रम

माझ्या शाळेत सर्वे सण साजरे केले जातात. सणांसाठी शाळेतील वर्गांची सजावट करणे ही जवाबदारी विद्यार्थ्यांवर असते. स्वतंत्र दिन आणि प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने आम्ही साजरे करतो. देशभक्तीवर भाषण आणि कविता लिहून आम्ही रंगमंचावर सादर करतो. शाळेत आम्हाला पर्यावरणावर सुद्धा महत्वाचे धडे दिले जातात. 'झाडे लावा आणि झाडे जगवा' अशी मिरवणूक आम्ही वृक्षारोपण सोहळ्याला काढतो. 'विज्ञान महोत्सव' सारखे सण सुद्धा असतात. ज्यामध्ये आम्ही नवीन नवीन शोध लावण्याचा प्रयत्न करतो. ज्याचे प्रयत्न चांगले तसे त्याला बक्षीस दिले जाते.

**सहली आणि इतर शाळेतील उपक्रम**

दर सहा महिन्यातून आमची सहल आयोजित केली जाते. सहिलीत आम्ही उत्पादन कंपन्यांना भेट देऊन आमचे विज्ञान वैषयिक ज्ञान वाढवतो. कधी कधी सहली मध्ये जर आपण कुठे एकाद्या ठिकाणी फसलो किंवा अडकलो असलो किंवा कठीण परिस्थितीमध्ये कसे आपण स्वतःचे रक्षण करू शकतो ते शिकवतात.

बाकीच्या क्रियाकलापामध्ये शास्त्रीय संगीत, योग अभ्यास सुद्धा आहे. ते आम्हाला बुधवारी आणि शुक्रवारी शिकवले जाते. आम्ही नियमित अभ्यास कसा करावा आणि नियमित अभ्यास केल्याने आपल्याला परीक्षेच्या वेळी गोंधळ होऊ नये या साठी प्रयत्न करतात. म्हणून शाळेतून शिकून गेलेले विद्यार्थी जे आज मोठ्या हुद्यावर आहेत त्यांचे विचार आम्हाला सांगतात. शाळेतल्या विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी मार्दर्शन दिले जाते. जिल्ह्यातली 'बेस्ट शाळा' म्हणून पारितोषिक आम्हाला मिळालेले आहे.